# मुले हवीत, तर शिक्षा नकोत!

कुठेतरी काना-कोपऱ्यात एखादी घटना घडते, वृत्तपत्रात त्याची बातमी बनते आणि एक दोन दिवसांत ती विरूनही जाते. समाजात फारसा कोणी तिचा विचार केला नाही तर ती समाजाच्या विस्मृतीत जाऊन नाहीशी होते. नुकत्याच वाचलेल्या एका बातमीबाबत असे होऊ नये, त्या बातमीचे खोलवरचे गांभीर्य समाजाच्या लक्षात यावे, त्यावर अधिक चर्चा घडाव्यात यासाठी हा ह्या लेखाचा प्रपंच.

घडलेली घटना अशी आहे :

पुण्याजवळील भोसरी येथे (प्रियदर्शिनी) नावाची एक इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. तिथे मराठी मुले जातात. आजचा संभ्रमित पालकवर्ग ज्या एका अशैक्षणिक मानसिकतेत अडकून आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून अडकवून 'कृतकृत्य' होतो, त्याचप्रकारे भोसरीच्या या 'प्रियदर्शिनी' नामक शाळेत मराठी पालकांनी आपल्या मुलांना घातले आहे. अर्थातच, या मुलांची पहिली आत्मसात केलेली भाषा मराठी असल्यामुळे, ती मुले परस्परांमध्ये नैसर्गिकरित्याच, मराठीतून बोलणार ! परंतु हे भाषेच्या नैसर्गिकतेचे शास्त्र हया शाळेच्या व्यवस्थापनाला एक तर कळत नाही, किंवा कळत असले तरी ते त्यांना मान्य नाही. त्यामुळे असे घडले की, अनेक मुले (आपल्या नैसर्गिकतेने) परस्परांशी फावल्या वेळात मराठीत बोलत होती, हे सहन न होऊन, या शाळेच्या जितेंद्र सिंग नावाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी २८ मुलांना बेदम चोपून काढले ! इयत्ता आठवीमधील ही सारी मुले होती. म्हणजेच शिक्षणहक्क कायद्याच्या संरक्षणाखालील ही मुले होती.

या घटनेचे तात्कालिक परिणाम अपेक्षित असेच आहेत. मार खाल्लेल्या काही मुलांच्या पालकांनी, 'चाईल्डलाईन' संस्थेच्या कार्यकर्त्यांसमवेत पोलीस स्टेशनवर जाऊन रीतसर तक्रार नोंदविली. आता जितेंद्र सिंग यांना अटक होऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल होईल. कालांतराने त्याचा निकाल लागून अपराधी जितेंद्र सिंग यांना कदाचित शिक्षाही होईल. या दिशेने काय घडते हे खूप महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहेत ते काही वेगळेच मुद्दे.

घडलेल्या घटनेचे एक एक पदर उलगडून पाहू या.

पहिली गोष्ट अशी की, ह्या घडलेल्या घटनेचे आणि त्यामागील घटना मालिकेचे वर्णन मार खाल्लेल्या मुलांनी स्वतःच केले आहे. ते असे आहे.

या शाळेची शिस्त काही न्यारीच आहे. येथे प्रत्येक वर्गात एक ‘भाषाप्रमुख’ नेमलेला असतो. तो कोणताही विद्यार्थी इंग्रजीशिवाय अन्य भाषेत, म्हणजे मराठीत वगैरे बोलला तर ठेवलेल्या रजिस्टरमध्ये त्याच्या नावापुढे फुली करतो. तक्रार करणाऱ्या मुलाचे रास्त म्हणणे असे की, “आम्हाला इंग्रजीतील नेमके शब्द बऱ्याचदा येत नाहीत आणि मग आम्ही तेथे कधी कधी मराठी शब्द वापरतो.” ह्या विद्यार्थ्यांच्या नावापुढे अशा तेवीस फुल्या जमल्या होत्या. वापरलेल्या प्रत्येक मराठी शब्दासाठी छडी मारण्याचा सपाटा ह्या जितेंद्र सिंग महोदयांनी चालविला. पण तेवीस छड्या मारूनही त्यांचा कंडू शांत झाला नाही, त्यामुळे विद्यार्थ्याने तेवीस छड्या झाल्याचे सांगूनही ते त्याला मारतच राहिले. दुसऱ्याही विद्यार्थ्याची अशीच कथा. अशाप्रकारे अठ्ठावीस विद्यार्थ्यांना बदडून काढणारी केवढी मोठी शक्ती या जितेंद्र सिंगाकडे आहे !

केवळ शक्तीच नव्हे तर विलक्षण क्रूरपणा या माणसाकडे आहे. कारण, “सिंग यांनी आपण किती छड्या मारतोय हे न मोजताच ते सटासट छड्या मारतच राहिले; इतके की, ती छडीच मोडली. मग त्यांनी काय करावे? मुलांना चक्क लाथा-बुक्क्यांनी हाणायला सुरुवात केली. विद्यार्थी माराने कोलमडून पडला तरी त्याचे मारणे थांबले नाही.” अशी मुलांची तक्रार आहे. “हाती लागेल त्या वस्तूने ते हाणतात ” अशीही मुलांची तक्रार आहे.

काय आहे ह्या साऱ्या घटनांचा आशय?

एक म्हणजे, या शाळेच्या ‘मुख्य कार्यकारी अधिकाऱ्या’ला साधे कायदे माहीत नाहीत. मुलांना शारीरिक शिक्षा करण्यास पूर्णतः बंदी आहे हे ह्याला माहीत नसावे हे आश्चर्य आहे. आणि जर माहीत असेल तर त्याने हे बेकायदेशीर कृत्य जाणून बुजून केले आहे, असे म्हणता येईल. म्हणजे, मुलांनी मराठी बोलण्याचा गुन्हा केल्याबद्दल शिक्षा करायची आणि याने मात्र कायदा मोडण्याचा गुन्हा करायचा !

दुसरे म्हणजे, एवढ्या मोठया प्रमाणावर हे शिक्षा प्रकरण घडले म्हणून याची शाळेबाहेर वाच्यता झाली. एरवी हे असे, ह्या शाळेत कायमच घडत असणार. सवयीप्रमाणे विद्यार्थी आणि त्यांचे पालक, इंग्रजी शाळा- चालकांना घाबरून, मूग गिळून स्वस्थ बसत असणार ! म्हणजे येथे एक अधिकारी व्यक्तीच नव्हे तर संपूर्ण शाळासंस्थाच गुन्हेगार आहे; आणि या गुन्हेगारीला (इंग्रजीच्या गुलामीपोटी) खपवून घेणारे पालकही दोषी आहेत.

तिसरी गोष्ट अशी की, अलीकडे, विशेषतः इंग्रजी माध्यमाच्या शाळांतून, हे ‘शिस्तीचे’ मोठे अवडंबर माजवले जात आहे. शिस्त म्हणून निरर्थक आणि शिक्षणव्यवहारात अडथळा ठरणारे बूट-मोजे-टाय घालायला

लावायचे; शिस्तीने (गुन्हेगारांसारखे) मुलांना हात मागे बांधून चालायला लावायचे, शिस्तीने ओळींत घट्ट बसवून ठेवायचे, शिस्तीने 'गुडमॉर्निंग सssर' असे बळजबरीने म्हणायला लावायचे; असे एक ना अनेक प्रकार आढळून येतात. शाळेचे असे सैनिकीकरण करून मुलांना सहजसुंदरतेने शिकता येत नाही, हे ह्या इंग्रजी शाळांना कोण पटवणार? पुन्हा असे की शालेय शिक्षणात प्रत्येक संस्था स्वतःच्या मर्जीने शिस्तीचे नियम ठरवणार आणि त्याखाली विद्यार्थ्यांना पिळून काढणार ! अशाच प्रकारचा सैनिकी शिस्तीचा प्रकार ह्या शाळेतही दिसून येतो. तसे नसते तर, वर्गावर्गांमध्ये मराठी बोलू न देण्याची शिस्तबध्द योजना आखली गेली नसती; शिस्त आणि शिक्षा ह्या सख्ख्या बहिणी आहेत. शिस्त हवी म्हणजे शिक्षा आलीच. ह्या दोन्ही गोष्टी विद्यार्थीविरोधी आणि त्याचबरोबर आधुनिक शिक्षणतत्त्वांच्या विरोधीही आहेत,

शिस्त व त्याला जोडून आलेली शिक्षा ह्या दोन्ही बाबी आधुनिक शिक्षणतत्त्वांच्या विरोधी आहेत: असे जे मी म्हटले आहे, ते आपण सर्वांनीच (यात मुख्यतः संस्थाचालक, शिक्षक आणि मुख्य म्हणजे पालकवर्ग) समजावून घ्यायला हवे.

आधुनिक शिक्षणशास्त्र असे म्हणते की, वर्गशिक्षण हे विद्यार्थ्यांसाठी भयमुक्त असले पाहिजे. विद्यार्थ्यांसाठी सारे शैक्षणिक वातावरण ताणरहित असायला हवे. शिक्षण असे नसले तर काय होते?

मानवी उत्क्रांतीच्या काळात, माणसाच्या मेंदूचे तीन थर विकसित झाले. त्यांची कार्ये वेगवेगळी आहेत. सर्वात खालच्या मेंदूला आपण 'जगण्या'चा मेंदू म्हणू या. आपल्या श्वासोच्छवासासारख्या आणि तहान, भूक वगैरे क्रिया, हा मेंदू, नियंत्रित करीत असतो. त्याच्या वरचा मेंदू हा 'भावनिक मेंदू' म्हणून ओळखला जातो. प्रेम, राग, लोभ अशा वेगवेगळया भावनांचा तो अधिपती आहे. त्यावरचा मेंदू हा प्रामुख्याने 'बौद्धिक मेंदू' आहे. विचार, भाषा, कल्पना, नियोजन, विविध विषयांचे आकलन अशा, मुलांच्या शिक्षणात येणाऱ्या सर्व बौद्धिक क्रियांचा हा स्वामी मानला जातो. कुठलेही बौध्दिक काम चांगले, एकाग्रतेने होण्यासाठी भावनिकदृष्ट्या स्थिर असण्याची गरज असते. भावनिक मेंदू हा अनेकदा बौद्धिक मेंदूवर कुरघोडी करण्याची शक्यता कोणत्याही प्रकारच्या ताणांमुळे, भीतीमुळे, रागामुळे असते. शिकण्याचे काम हे बौद्धिक काम असेल तर ते ताणरहित, भीतीरहित आणि मुख्य म्हणजे स्वतंत्रतेच्या, मुक्ततेच्या मानसिक वातावरणात नीटपणे होऊ शकते. किंबहुना म्हणूनच शाळा-शाळांतील वातावरण तसे असावे लागते, विद्यार्थी मानसिकदृष्ट्या प्रसन्न असेल तर आणि तरच शिक्षण प्रभावीपणे होऊ शकते. ज्या शाळांना, संस्थाचालकांना, शिक्षकांना हे कळत नाही ते मुलांना उलटया पध्दतीने, म्हणजे धाकदपटशाने, बळजबरी करून, शिस्त-शिक्षांचे अवडंबर माजवून

शिकविण्याचा खटाटोप करतात आणि अंतिमतः ते शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसानच करीत राहतात. मला असे आढळते की बऱ्याचदा इंग्रजी माध्यमाच्या शाळा आढ्यतेने, पारंपरिक गैर अशा शिक्षण विचारांनी शिस्तीचे-शिक्षांचे स्तोम माजवतात. जेवढी शिस्त गहिरी तेवढी शाळा चांगली असे, दुर्दैवाने, पालकही मानतात आणि आपली मुले नीटपणे न शिकण्यासाठी अशा शाळांकडे सुपूर्त करतात.

आपण जो आधुनिक शिक्षणाला आधारभूत अशा मेंदूशास्त्राचा विचार करीत आहोत तो केवळ शाळांमधील वातावरणाशी संबंधित नाही; तर तो शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी व पुढील जीवनाशी घनिष्टपणे जोडलेला आहे. कोणतेही बौद्धिक काम मुलांकडून व्हायचे असेल तर, त्यासाठी, जे काही अवलंबिले जाईल, जी शिक्षणपध्दती वापरली जाईल, जी वागणूक संबंधित प्रौढांची असेल ती शिकण्याला आणि म्हणून शिकणाऱ्या मेंदूला पोषक अशी असावी लागते; घातक असून चालत नाही.

आपण हे लक्षात ठेवून पुन्हा एकदा प्रियदर्शिनी शाळेत घडलेल्या घटनेचे विद्यार्थ्यांवर काय परिणाम होतील ते जाणून घेऊ या.

१.पहिला आणि तात्कालिक परिणाम असा होईल की, दिलेल्या मारामुळे केवळ तेवढाच वेळ नव्हे तर पुढे कित्येक दिवस वर्गात त्यांचे लक्ष लागणार नाही; ज्यासाठी ही मुले शाळेत आली ते त्यांचे शिकणेच नीट होणार नाही. म्हणजे अशा जबरदस्त शिक्षेमुळे शाळेने मुलांचे शैक्षणिक नुकसान केल्याबद्दल (आणि बहुधा असे नेहमीच करीत असल्याबद्दल) शिक्षणाबाबतचे नीती-नियम-कायदे पाळत नसल्याबद्दल शाळेवरच खटला भरायला हवा आहे.

२.खुद्द विद्यार्थ्यांच्या मनांवर ह्या प्रियदर्शिनी शाळेतील अघोरी शिक्षेचा परिणाम फार विपरित होऊ शकतो. मेंदूशास्त्र असे सांगते की, शिक्षांमुळे, मारामुळे, मेंदूच्या बौद्धिक भागातील रक्तपुरवठा घटून तो भावनिक मेंदूकडे जातो. याला शास्त्रीय भाषेत 'घसरण' असे म्हणतात. अशी रक्तपुरवठ्याची घसरण होऊन मुले भावनिक स्तरावर जातात. एकीकडे बौद्धिक काम बंद पडते तर दुसरीकडे तीव्र भावनिक अवस्था येऊन मुले भितीग्रस्त होऊन भावनेने शाळेपासून - शिकण्यापासून दूर जाऊ लागतात. हा परिणाम केवळ तात्कालिक नसतो, तर तो दूरगामीही असू शकतो. 'शिकणे म्हणजे मार', 'शिकणे म्हणजे शिक्षा-भीती' अशी भावना होणे हे आयुष्यभर 'शिकण्या'पासून परावृत्त करणारेही असू शकते.

३.जेव्हा शाळेमध्ये कायमच भीतीग्रस्त वातावरण असते तेव्हा, आणि जेव्हा सदोदित मुलांना अपमानित केले जाते तेव्हा, आणखी एक परिणाम तीव्रतेने घडू शकतो. 'रक्ताची घसरण' आणखी होऊन, ते खालच्या

‘जगण्याच्या’ मेंदूकडे जाऊन, काही काळ मुलांची मने भीतीने तरी ग्रस्त होतात, अथवा सुडाने तरी पेटून उठतात. टोकाची स्थिती अवतरली तर भीतीने ग्रस्त होऊन क्वचित आत्महत्येपर्यंत एखादा विद्यार्थी पोचतो तर एखादा विद्यार्थी सुडाने पेटून गुन्हेगारीकडे वळतो. सामान्यतः चित्र असे दिसते की, युवकांच्या गुन्हेगारीची बिजे शालेय शिक्षणातील विपरिततेत रुजतात आणि पुढे वातावरणातील संधींनी फोफावतात. प्रियदर्शिनी शाळेतील शिक्षकांनी व संस्थाचालकांनी या परिणामांचा गंभीरपणे विचार करून आपल्या शाळेतील वातावरण आमूलाग्र बदलले पाहिजे. पालकांनी सुध्दा आपली मुले ह्या शाळेतून काढून घेतली पाहिजेत. अशा मग्रुर शाळा चालण्यापेक्षा बंद पडलेल्या चांगल्या; याने समाजहित अधिक साधेल !

ह्या घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने आणखी दोन मुद्यांचा स्वतंत्रपणे विचार करायला हवा. एक, भाषा शिक्षणाचा आणि दोन खुद्द मराठी भाषेचा.

मुले लहान वयांत भाषा चांगली आत्मसात करतात. शाळेत प्रवेश करेपर्यंत त्यांनी आत्मसात केलेली पहिली भाषा (या उदाहरणात) ही त्यांची आयुष्यभरची विचारांची, दुसरे विषय शिकण्याची आणि इतर भाषा अवगत करण्याचीही नैसर्गिक भाषा असते. ती जितकी समृध्द होईल, तितकी ही इतर शिक्षणकार्येही प्रभावी रीतीने होतील. त्यामुळे प्रियदर्शिनी शाळेत, मराठी भाषा टाळून नव्हे तर अधिक समृध्द करून विद्यार्थ्यांचे भाषिक भले होणार आहे. नाहीतरी ह्या शाळेत (आणि अशा सर्वच इंग्रजी माध्यमाच्या शाळांत) मराठी मुले प्रवेश करताना आपली मराठी भाषेची आयुधेच घेऊन येणार. अशावेळी शहाण्या शाळा त्याचा सुयोग्य वापर करून ह्या मुलांना इंग्रजीकडे वळवू शकतात. ही शैक्षणिक प्रक्रिया नैसर्गिकतेला धरून होईल. शिवाय यात, मुलांचा दुहेरी फायदा होईल. एका केवळ इंग्रजीऐवजी, इंग्रजी व मराठी अशा दोन्हीही भाषा मुलांना उत्तम येतील. प्रियदर्शिनी शाळा, केवळ इंग्रजीचा अट्टहास करून विद्यार्थ्यांना एक भाषिक तेही परभाषिक करू पाहत आहे. परंतु इतकेच नाही. ही शाळा विद्यार्थ्यांना, इंग्रजी भाषा ही प्रथम महत्त्वाची आणि मराठी भाषा ही दुय्यम दर्जाची असाच धडा देऊ पाहत आहे. मराठी भाषेविषयी प्रेमच वाटू नये, मराठी भाषेची, त्याकरवी मराठी संस्कृतीची नाळ तोडण्याचा हा प्रयत्न आहे. बऱ्याचदा इंग्रजी माध्यमाच्या शाळा असे भाषिक व सांस्कृतिक खच्चीकरण करू पाहत आहेत.

आणि नेमका हाच प्रयत्न प्रियदर्शिनी शाळेचा अधिकारी जितेंद्र सिंग हा करू पाहत आहे, असे त्याच्या भयभीत करणाऱ्या अन्याय्य कृतीवरून दिसून येत आहे.

ही अघोरी शिक्षेची घटना वाचनात आल्यापासून, जितेंद्र सिंग ह्या प्रियदर्शिनीतील अधिकाऱ्याचा मानसिक तोल ढळण्याच्या कृतीचाही मी विचार करतो आहे. मुलांच्या सांगण्यावरून, असे दिसते की, हा माणूस वाट्टेल तसे मुलांना बडवत बसला होता. त्याचा संयम पार सुटला होता. असा संयम सुटण्याचा प्रसंग कशामुळे उद्भवला? वास्तविक मुलांचे वागणे त्याच्या परिचयाचे होतेच. मुलांना मराठी बोलू न देण्यासाठी त्याने वर्गांतून तशी कायमची व्यवस्थाही करून ठेवलेली होती. मग तोल गेला तो मुलांवरच्या रागामुळे की 'मराठी' भाषेवरील रागामुळे?

मला दुसरी शक्यता अधिक वाटते आहे. एरवी, मुलांनी इंग्रजी बोलावे यासाठी प्रयत्न करण्याऐवजी, मराठी बोलू नये यासाठी, वर्गातील व्यवस्था उभी करून मुलांवर बळजबरी करण्याचे कारण नव्हते.

मराठीचा आकस जर महाराष्ट्रातील इंग्रजी शाळा सांभाळणार आणि वाढवणार असतील, तर तो शासनाने आणि राजकीय पक्षांनी दखल घ्यावी असा प्रश्न आहे. मराठी भाषकांनी चिंता करावी, चिंतन करावे असा हा प्रश्न आहे !